.ग्रं. सं. ठाणें
काव्य
२५३५



# भीमगाथा



# बुध्दसंथा

REFBK-0024810
REFBK-0024810

आनंद प्रकाशन
औरंगाबाद

• बी.पी. काकडे

संभ्रम काव्य
२५३५
२८८९०
१।२।८९

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
काव्य ग्रं. क्र. २५३५ २८८९० १।२।८९
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# भीमगाथा बुद्धसंथा

बी. पी. काकडे
( कवि किशोर )

REFBK-0024810
REFBK-0024810

आनंद प्रकाशन, जयसिंगपुरा, औरंगाबाद
४३१ ००४

प्रकाशक
शंकरराव हातोले, एम. कॉम. बी. लिब. सायन्स
आनंद प्रकाशन, जयसिंगपुरा, औरंगाबाद

मुद्रक
नाना डेंगळे
साधना प्रेस
४३०-३१ शनिवार पेठ
पुणे ४११ ०३०

किंमत ७ रुपये

प्रकाशन क्र. १९

सर्व हक्क प्रकाशकाकडे

मुखपृष्ठ : अनंत सालकर

**पुस्तके मिळण्याचे ठिकाण**
बौद्ध व दलित साहित्याचे विक्रेते
आनंद बुक डेपो, जयसिंगपुरा, औरंगाबाद

# प्रकाशकीय

या शतकाच्या पूर्वार्धात बाबासाहेबांच्या हयातीत त्यांच्या तत्त्वज्ञानाने भारावलेली दलित समाजात एक पिढी होती. ज्यांनी दलित चळवळीला आपले सर्वस्व वाहिलेले होते, अशी ही ध्येयवेडी माणसे होती. त्यांपैकीच कवि–किशोर (बी. पी. काकडे) हेही एक होत. काही दिवसांपूर्वी माझा व त्यांचा परिचय झाल ा मुंबईला सहज माझ्या कामानिमित्त मी गेलो असता 'भारतीय बौद्ध महासभा' बीडीडी चाळ, वरळी, येथील ग्रंथालयात माझ्या स्वत:च्या पुस्तकासाठी काही महत्त्वाचे संदर्भ पाहत असताना आयु. भाऊसाहेब अडसूळ यांची भेट झाली. भेटीतील चर्चेत सदरचे कवी किशोर–काकडे यांचा कवितासंग्रह प्रसिद्ध करण्यासाठी श्री. अडसूळ यांनी विचारणा केली, परंतु ही सूचना मी हातोहात फेटाळून लावली. कारण व्यवसायाच्या दृष्टीने कवितासंग्रह प्रसिद्ध करणे ही गोष्ट परवडणारी नाही, हा माझा प्रकाशनक्षेत्रातील अनुभव आहे. कारण खिशातील पैसे काढून कवितासंग्रह विकत घेणे व तो वाचणे ही सर्वसाधारण माणसात प्रवृत्ती नसते. यावर भाऊसाहेब अडसूळ, विश्वासराव भोसले, इंजेमास्तर यांनी आग्रही भूमिका घेऊन पुन्हा एकदा विनंती केली आणि नंतर ज्यावेळी काकडे यांनी आपल्या कविता स्वत: वाचून दाखविल्या, त्यावेळी मी अक्षरश: भारावून गेलो. प्रसिद्धीपासून दूर असणारा हा कवी जन्मत:च प्रतिभेचं लेणं घेऊन जन्माला आला आहे, असं मला वाटलं. दलित चळवळीतील अनेक प्रसंगांवर त्यांनी कविता केल्या आहेत. साठी उलटलेला वृद्ध माणूस, परंतु मनाने आजही तरुण आहे. बाबासाहेबांच्या चळवळीतील तेज, स्वाभिमान, अस्मिता यांचे प्रतिबिंब त्यांच्या प्रत्येक कवितेमध्ये दिसून येते.

आज दलित साहित्य फोफावत आहे. आत्मचरित्र, कथा, नाटके, कविता यांची वारेमाप निर्मिती होत आहे. यामध्ये 'मागणी तसा पुरवठा' ह्या तत्त्वाला धरून होणारे लेखनसुद्धा बऱ्याच प्रमाणात आहे. याची एक प्रकाशक म्हणून मला जाणीव आहे. परंतु प्रस्तुतच्या काव्यसंग्रहाचे कवी हे एक जुन्या पिढीतील दर्जेदार कवी आहेत. त्यांचे लेखन ज्यावेळी सुरू झाले त्यावेळी दलित साहित्याचा जन्मही नव्हता. वर्डस्वर्थने एके ठिकाणी असे म्हटले आहे की, 'कविता म्हणजे मनुष्याच्या भावभावनांचा उत्स्फूर्त असा उमाळा होय.' कवी काकडे यांचे जीवन मी जवळून पाहिले. कविता जगणारी ही व्यक्ती आहे, असे मला दिसले. त्यांच्या कवितांमध्ये केवळ भ ावनांचाच कल्लोळ नाही, किंवा शब्दांचे अवडंबर नाही. तर सभोवतालच्या परिस्थितीचे जागृतपणे केलेले निरीक्षण शब्दबद्ध केलेले आहे. भ. बुद्ध, महात्मा

फुले, मंहाडचा मुक्ती संग्राम काळाराममंदिराचा सत्याग्रह– (महाडमुक्तिसंग्राम) पुढारी इ. अस्मिता जपण्यासाठी केलेल्या चळवळी या सर्वांना कवीने या कवितेत आपल्या खास शैलीत सजवून काव्यरूप दिले आहे.

वास्तविक पाहता आज दलित चळवळीची दैन्यावस्था, पुढाऱ्यांचा स्वार्थीपणा आणि दिशाहीनता यामुळे सर्वसामान्य दलित माणूस भांबावून गेला आहे. डॉ. बाबासाहेबांच्या तेजस्वी चळवळीच्या स्मृती गोंजारीत बसणे हाच एक विरंगुळ्याचा भाग त्याच्यासाठी आहे, अशा काळात काकडे यांच्या भावपूर्ण आणि विचारपूर्ण कविता दलित आणि सर्वच रसिकांचे मनोरंजन आणि त्याचबरोबर मार्गदर्शन करतील अशी माझी पूर्ण आशा आहे.

१९८४

शंकरराव उ. हातोले
एम. कॉम. बीलीवएस्सी
(औरंगाबाद)

# माझे हृद्गत--माझे मनोगत

कार्यालय ग्रंथ शाखा

माझी पहिलीवहिली कलाकृती– काव्यसंग्रह (संभार) " भीमगाथा–बुद्ध-संथा " (संहिता) आज आमजनतेच्या–रसिक जनांच्या, माझ्या प्रिय बंधू भगिनींच्या पवित्र चरणी, त्यांच्या खास सेवेसाठी रुजू होत आहे याचा मला अत्यानंद होत आहे. वास्तविक पाहाता हा काव्यसंभार यापूर्वीच म्हणजे १९५०–५१ च्या दरम्यान किंवा त्याही अगोदर प्रसिद्ध व्हावयास पाहिजे होता. परंतु माझ्या तशाच काही अपरिहार्य अडचणीमुळे तो राहत राहत गेला व त्याच्या प्रसिद्धीकरणास १९८४ साल उजाडले. परंतु अप्रकाशित वाङ्मयदेखील प्रसिद्धीकरणावर मात करते याचा मला पुरेपूर प्रत्यय आला. हस्तलिखित वाङ्मयाचा आलेखदेखील जनमानसाच्या हृदयपटलावर वज्रलेप करू शकतो याचे प्रत्यंतर मला १९४० पासून तहत आजपर्यंत सतत येत गेले. रसिकजनांच्या कंठा-ओठांतून स्तवत, ओसंडत, निनादत, कंठाकंठातून साकार होणारे हे गतिमान अक्षरकाव्य रेकॉर्डच्या स्वरूपात, आकाशवाणीच्या अवकाशात, 'क्रांतिवैभव'सारख्या वैभवशिखरास पोहोचलेल्या विख्यात श्रेष्ठ प्रतीच्या कलापथकाच्या अखंड प्रकाशझोतात साकार होत होत, विस्तारत जात जात– आकार घेत घेत–जलशाच्या जल्लोषात, प्रभात-फेऱ्यात गाजणाऱ्या गीतांच्या मैफलीत धुंद होत होत अनेकविध सभा, संमेलनांतून ही वाङ्मयश्री मिरवली. काव्यमय कलाकुसरीची हलकीफुलकी नितांतसुंदर मोरपिसे लावून बहरताना ती लहरत होती. आज ती अक्षरांच्या आलेखाने अलंकृत, बंदिस्त होत असून ही 'भीमवाणी–बुद्धवाणी' बहुजनहिताय, बहुजनसुखाय या बीजांकुराने प्रफुल्ल तशीच फलभारित होऊन अखिल मानवजातीची सेवा करण्यास सिद्ध झाली आहे. वास्तविक हा तृणांकुर कोटयवधी रविकिरणांच्या तेजोनिधीतून, रवितेजाच्या साम्राज्यातील सम्राट बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पदकमलाच्या उगमातून उत्स्फूर्त होत होत वरप्रसाद देता झाला आणि हेच ते स्फूर्तिस्थान आज चिरंजीव होत आहे. विद्रोही काव्यप्रकृतीद्वारे आज ग्रंथरूपाने प्रगट होत आहे. हे वरदान, स्वरदान, करदान म्हणजेच अक्षरदान देत असताना दीनदलितांवर, बौद्ध जनतेवर होणाऱ्या असह्य पाशवी अत्याचाराच्या छळांच्या कळांचे समूळ निर्दालन व्हावे म्हणूनही हे गतिमान असे वज्रशस्त्रधारणेचे अभय–आश्वासन त्याच वेळी दिले गेले आहे आणि म्हणूनच तळागाळाच्या, पीडितांच्या, हीनदीन अबलांच्या पोटतिडकीच्या हंबरडयाने हैराण होऊन, वैराण वाळवंट तुडवीत तुडवीत, सैतानी सत्तेच्या मुजोर, जुलमी, बेलगाम अन्यायाचा प्रतिकार करण्याचे रणकंकण बांधून हे व्रतसंधान अचूकपणे आता

पेलावयाचे आहे. या सवर्णीयांच्या लाजिरवाणी कसाबकरणी कर्णोपकर्णी जगाच्या वेशीवर टांगून आमची ही होणारी भयानक क्रूर कत्तल–विटंबना आम्हाला कायमची संपुष्टात आणावयाची आहे. समता, स्वहक्क, न्यायाच्या तराजूत जोखून स्वातंत्र्य, अस्मितेचा, मानवी महतेचा काटेकोर हिशेब आम्हाला मिळवायचा आहे. या वर्णसंघर्षाचा परामर्श घ्यायचा आहे. स्पृश्यास्पृश्यतेचा स्पर्श, निष्कर्षाप्रत यावयाचा आहे. आणि त्यामुळेच ही विद्रोही काव्यकलाकुसर अवतीर्ण होत आहे, प्रगट होत आहे.

आम्ही भारतीय– भारताचे सुपुत्र असताना, देशाशी एकनिष्ठ असताना, केवळ रूढी, परंपरा, भेदभाव, वर्णविग्रह, उच्चनीचतेचे अवडंबर माजवून आमच्या जिवाशी खेळ खेळणारे भस्मासूर आपोआपच भस्मीभूत होऊन जातील, पण देश विकलांग मात्र करून जातील. राष्ट्राच्या इभ्रतीला तडा लावणारे धर्मवीर, राष्ट्रद्रोही तर आहेतच, पण बंधुद्रोही, मानवद्रोहीही खास आहेत.

जगाच्या पाठीवरील कोणताही धर्म अधर्माकडे वळत नाही, किंवा तशी शिकवण पण देत नाही. असे असता हिंदू धर्मीयांनी एवढे माणुसघाणे का असावे ? उदंड क्रौर्याची परिसीमा का गाठावी ? दुर्दैवाने बुद्धिवंत राजकारणीदेखील आज माणसांच्या साठमारीचा दुष्ट खेळ खेळत आहेत. आपले आसन स्थिर व्हावे म्हणून ही बलिप्रथा पाडीत आहेत. माणसांना जाळीत आहेत, घरे पेटवीत आहेत ही काय राष्ट्रसेवा ? ही काय स्वातंत्र्याची निशाणी ? हेच का ते स्वातंत्र्य ? असे अनेक यक्षप्रश्न डोक्यात घुमाकूळ घालीत मन उदासून जाते. मी कोणत्याही धर्माविरुद्ध नाही अगर जाती–समाजाविरुद्धही नाही. पण ज्यांनी आपल्या स्वार्थासाठी धर्माच्या नावावर स्वैराचार, दुष्ट रूढी, परंपरा इत्यादी धर्मात घुसडल्या व त्याचेच भांडवल करून ढोंगधतुरे माजविले, त्या त्यांच्या तत्त्वाविरुद्ध मात्र आम्ही केव्हाही झगडतच राहू. देशाशी इमान राखण्यासाठी आम्ही प्राणपणाने लढतच राहू. शांतताप्रिय बौद्ध धर्माच्या प्रशांतीची प्रस्थापना हा राष्ट्राचा कणा आहे व तो आमचा बाणा आहे.

जातीयतेचा त्रस्त समंध आज चोहोकडे धुमाकूळ घालीत आहे उच्चनीचता बोकाळली आहे आणि चेकाळलीही आहे. हा पीळ सवर्णीय सोडीत नाहीत, त्यांच्या रक्तातच तो आहे.

मी व माझे कुटुंब या मुंबईत ज्या ठिकाणी राहतो तेथेही हेच आहे ही जातिपातीची विषवल्ली– सवर्णीयांच्या लागीर, चिकट भुतावळीप्रमाणे आमच्या सर्व कुटुंबाला २५ वर्षांपासून ग्रासीत आहे. हात धुवून आमच्या मागे लागली आहे. या इमारतीतील गणंग आम्हाला सळो की पळो करून सोडीत आहेत. आमच्यावर

जुलूम, अत्याचार करीत आहेत. आमचे मनस्वास्थ्य कायमचे उडवून टाकीत आहेत. जातीचा तोरा मिरवीत आहेत.

आम्हाला नको जन्म करीत आहेत. कारण काय तर जात. अशांच्या कळपात आमचे एकटे कुटुंब सापडले आहे. याची दाद कोण घेतो ? सगळे एकाच माळेचे मणी.

आज भारताच्या लोकसंख्येच्या ⅕ एवढा हा शूर समाज उच्चवर्णीयांनी टरफलाप्रमाणे दूर फेकून द्यावा, हवा तसा त्याला रगडावा वाकवावा, बहिष्कृत करावा हे या स्वतंत्र भारताचे दुर्दैवच नाही तर काय ! एकसंघ– एकजिनसी हा भारत देश जगाच्या कुठल्याही विराट शक्तीपुढे अजिंक्य राहील हे या शुद्ध भारतीयांना कळू नये काय ? पण याला काय उपाय ? हे कळावे म्हणूनच हा सारा प्रपंच.

या काव्यसंग्रहातील काव्यरचना घडलेल्या प्रसंगानुरूप छंदोबद्ध झालेल्या आहेत. त्यात पदरचे काही नसून वास्तव स्वरूपातील गतगोष्टींचा तो एक आढावाच आहे.

इतर काही कविता मात्र याच गोष्टींच्या अनुषंगाने, इंगळयांचे डंख अनावर झाल्याने, काव्यस्वरूपाने विभूषित झाल्या आहेत. या समाजाची सेवा घडावी, त्याची उन्नती, प्रगती व्हावी, त्याला चैतन्य यावे, जागृती व्हावी–भीमस्मृती–बुद्धस्मृती अखिल समाजात रुजावी, वृद्धिगत व्हावी या उच्च हेतूने प्रेरित होऊन मी हा काव्यसंग्रह माझ्या बंधू–भगिनींच्या सेवेस हजर करीत आहे, नम्रपणे नजर करीत आहे व पुढील काव्यपंक्तीने भगवंताची करुणा भाकीत त्याच करुणामय भगवंताच्या नावाचा गजर करीत आहे.

कळस जाहला अन्यायाचा दुःखा नाही सीमा ।
दलित जगत हे जळते आहे तूच वाचवी भीमा ॥
करा रक्षणा भगवन याहो अभयहस्त द्या धम्मा ।
ऐकुनि धावा करुणाकर ये बौद्धांच्या परित्राणा ॥

शेवटी हा काव्यसंग्रह प्रकाशित करण्यास, त्यास आजचे स्वरूप देण्यास माझे परममित्र मा. व्ही. के. इंजेमास्तर, मा. भाऊसाहेब अडसूळ, मा. विश्वासराव भोसले, आ. श्री. रणपिसे इत्यादी माझ्या जीवश्चकंठश्च सन्मित्रांनी मला वेळोवेळी प्रोत्साहन देऊन महामोलाचे सहकार्य केले व हा संग्रह प्रकाशात आणण्यास प्रकाशक मिळवून दिला याबद्दल मी या सर्वांचा ऋणी आहे, त्याचप्रमाणे आनंद

प्रकाशनचे सन्माननीय प्रकाशक, धडाडीचे कार्यकर्ते शंकरराव हातोले (औरंगाबाद) यांनी अत्यंत परिश्रमपूर्वक तत्परतेने व आस्थेने या संग्रहास प्रकाशित करण्याची जबाबदारी स्वीकारली हे माझ्यावर त्यांचे मोठेच उपकार आहेत. अगदी थोड्या कालावधीत त्यांनी काव्यसंग्रहास प्रकाशित केले. या माझ्यावरील उपकाराबद्दल मी त्यांचा सदैव आभारी आहे. 'श्रीरंग'चे मालक माननीय हडकर साहेब यांनी सहकार्य केले. तसेच साधना प्रेसचे नाना डेंगळे व कर्मचारी वर्ग यांनी सुबक छपाई करून दिली याबद्दल त्यांचाही आभारी आहे.

बा. पं. काकडे
ऊर्फ कवि–किशोर (फलटण)
३/७७ आंबेडकर नगर, हौसिंग कॉलनी वरळी,
वरळी, मुंबई–४०० ०१८

माझे तीर्थस्वरूप – अण्णा

आणि

अखिल बौद्ध व पददलित जगताचे परमश्रेष्ठ पितामह, परमपूज्य, परमप्रिय दैवत बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पवित्र चरणी सादर समर्पण !

– बा. पं. काकडे

( कवि– किशोर ) फलटण

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | भीमप्रतिज्ञा ! | ५ |
| २ | राजगृहाकडे ! | ६ |
| ३ | जोत्यावरील जात्यावरी | ७ |
| ४ | कायदेमंत्री भीम | ९ |
| ५ | भिम केवढा केवढा ! | १० |
| ६ | माहेरच्या वाटेवर | ११ |
| ७ | सर्वसाक्षी ! | १२ |
| ८ | दवंडी | १३ |
| ९ | संकल्प | १४ |
| १० | विश्ववंद्य भीमा ! | १५ |
| ११ | आपले घर ! | १६ |
| १२ | शुभप्रयाण ! | १७ |
| १३ | सांगावा | १८ |
| १४ | शोध | १९ |
| १५ | मी माणसास मानतो ! | २१ |
| १६ | वचनपूर्ती ! | २२ |
| १७ | धन्य महात्मा फुले | २४ |
| १८ | महाडची मोहीम ! | २६ |
| १९ | काळाराम वेढा, गाई पन्नाशीचा पाढा | २८ |
| २० | धिःकार ! धिःकार ! | २९ |
| २१ | बौद्धमय भारत ! | ३० |
| २२ | धम्म सीमोल्लंघन ! | ३१ |
| २३ | सुसज्ज दलभार | ३२ |
| २४ | निळा झेंडा | ३३ |
| २५ | ध्वज उंच उभारा ! | ३४ |
| २६ | गरुडभरारी ! | ३५ |
| २७ | ती चिता – तिची गाथा ! | ३६ |

| | | |
|---|---|---|
| २८ | निर्वाणीचा लढा ! | ३९ |
| २९ | बलिसत्र ! | ४० |
| ३० | सर्वव्यापी भीम ! | ४२ |
| ३१ | – इतिश्री | ४३ |
| ३२ | माझ्या प्राणप्रिय समाजा, | ४४ |
| ३३ | रात्र वैऱ्याची आहे, समाजा, जागा राहा ! | ४६ |
| ३४ | दत्तकविधान | ४७ |
| ३५ | पुढारी ? पुंडअरी ! | ४९ |
| ३६ | शाप–उःशाप ! | ५१ |
| ३७ | गंगार्पण ! | ५३ |
| ३८ | अघटीत–अतर्क्य ! | ५६ |

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)
क्र. 2435

## भीमप्रतिज्ञा !

‘ हिंदू म्हणुनी जन्मा आलो, माझा दोष न काही !
पण मरताना हिंदू म्हणूनी मरणारच मी नाही !’ ॥ धृ० ॥
हिंदू म्हणजे ज्ञाती सौदा, हिंदू म्हणजे अंधश्रद्धा
ब्राह्मण्याचा गडबडगुंडा
देवांचा बाजारी धंदा ढोंग धतूरे पाही ! ॥ १ ॥
अप्पलपोटे, नीतीभ्रष्ट, निर्दय, कपटी, जातीनिष्ठ !
नको कराया यांना कष्ट
गलेलठ्ठ हे नष्ट व्हायचे, स्पष्ट देतसे ग्वाही ! ॥ २ ॥
धर्म कशाला यांना व्हावा ? आणि कशाचा कोणा ठावा ?
पोटभरूंचा अड्डा फसवा
धर्मलंड हे षंढ पाहता होते लाही लाही ! ॥ ३ ॥
माणुसकीचा गंध न यांना, समतेचा वरवरचा मुलामा
भवितव्य या नाहि गुलामा
नराधमांना क्षमा कधीही नाही, झोटिंगशाही ! ॥ ४ ॥
अर्थहीन हा धर्म वळूंचा ! रक्तपिपासू धुंद जळूंचा
चेटकुळांचा, बांडगुळांचा !
धर्म कशाचा निव्वळ फतवा, पापाची ही खाई ! ॥ ५ ॥
देशद्रोही, चोर, कसाई, मानवतेचे शत्रू हेही
धर्म भुतांना नाही नाही
म्हणुनी असला धर्म गाडुनी बौद्धच व्हा लवलाही ! ॥ ६ ॥

# राजगृहाकडे !

[ विश्वविख्यात, दिगंत कीर्तीचे, विद्वद्भूषण, दलितोद्धारक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची विलोभनीय लोकप्रियता व सत्कीर्ती जगाच्या कानाकोपऱ्यांत अहर्निश दुमदुमत होती.

दलित समाजातील हे नवचैतन्य व जागृतीचे हे महापर्व सर्वथैव भीममय झाले होते.

अशा वेळी हा 'दलितांचा देव' आहे तरी कसा ? हे अलौकिक कौतुक पहाण्यासाठी उत्सुकतेच्या शिगेने घेरलेले, भारलेले दोन खेडूत भीमभक्त, भीमराजाच्या दर्शनासाठी आसुसलेले, डोळ्यांत प्राण आणून, पायीच वाटचाल करीत करीत मोठ्या आशेने 'राजगृहाकडे' निघालेले आहेत. ]

चल राजघराला जाव् – अन् पाहू त्यो भिमराव् ।
बिगिबिगी भिडू चल धाव् – पायावर पुस्पं व्हाव् ! ।। धृ० ।।
रुपडं ते गोजिरवानं ! मोत्याचं न्यारं दानं !
जनु शंभर नंबरी सोनं !
मोक्षाची दारं पाव् – राजावर ठेवुन् भाव्
पायाला डोकं लाव् – पुन्याचं फुटलं प्याव् ।। १ ।।
भरदार गड्याचा बांधा ! त्यो जिवाशिवाचा सांधा !
वैऱ्याचा अक्षी दादा !
खोकाड करी लइ च्याव् – जवा दाकावलंया भ्याव्
मंग गारच पडलं राव् – वघ्राचं ऐकुन नाव् ।। २ ।।
दुनियात किरत राजाची ! लइ पिरत आम्हावर त्याची
करि राखण दिनदुबळ्याची !
सोशिलं हिऱ्यानं घाव् – पाताळी घेउन ठाव्
अन् मेळविलं हे नाव् – चल त्याची कीरत गाव् ! ।। ३ ।।
ह्यो झेंडा बघ दलितांचा !
ह्यो कोट खड्या सैन्याचा !
ह्यो सर्ग दयावंताचा !
गरिबांच्या देवा, पाव् !
दे दर्शन एकच डाव् !
लइ थोर हिऱ्याची माव् !
पिरतीचा करि वर्षाव् ! ।। ४ ।।

# जोत्यावरील जात्यावरी

उगवला नारायण, पसरलं सोनं सोनं
जयंतिचा आज सण, जाहला ग भीमजन्म ! ॥ १ ॥
गुढ्या उभारा, तोरणं, सण करा आनंदानं
चौदा एप्रिलचा जन्म, पुजा भिम भगवान ! ॥ २ ॥
भिमराजाची जयंती, गावगन्ना मोठी होती
ओवाळु ग त्या आरती, रत्न चमके भारती ॥ ३ ॥
जितं जागृत दैवत, घटनेचं दे अमृत
उभा केला ऐरावत, साजिवंत हो भारत ! ॥ ४ ॥
बाबासाहेब आंबेडकर, अवतरे घरोघर
जयभिम निरंतर – नाव त्याचं जीभेवर ॥ ५ ॥
मायबहिणी, बांधव, उद्धारिले सर्व सर्व
परमपूज्य भीमराव – गोरगरीबांचा देव ॥ ६ ॥
देणं त्याचं आम्हां ठावं, दान त्याचं गावोगाव
राजा माझा भीमराव, त्यानं केलं मोठं नाव ॥ ७ ॥
गोरगरीबाच्यावर, त्याच्या जिवाची झालर
कोंबडिचि पिल्लांवर – एकसारखी नजर ॥ ८ ॥
व्हता अंधारी अंधार – माझ्या भिमा अगोदर
पिढ्यापिढ्यांना जहर – देति मुंग्यांना साखर ॥ ९ ॥
कोरचतकोरीवरी, जगण्याचि होती चोरी
आग, जाळ घरोघरी, जिणं जाळलं अंधारी ॥ १० ॥
कुत्र्याचि परवड – सारखीच हडहड
मार झोड हाडशीर, जसं काहि जनावर ॥ ११ ॥
जिव जळत्या घरात – पाण्यावीण तडफडत
वस्त्रावीण कुडकुडत, थंडी, ऊन पावसात ॥ १२ ॥
जातं काढी भरडून – पीठ करीते दळून
तसं घेतलं पीळून, पहीलंच हे वळण ॥ १३ ॥
हाल काढिलं, सोशीलं, गरीबीस त्या पोशीलं
पण भलं त्यानं केलं, झाड त्यानं वाढवीलं ॥ १४ ॥

केलि किती वणवण, बेड्या तोडी मण मण
सोशी ऐरणीचे घण, केलं त्यानं निवारण ॥ १५ ॥
माणसांत तो आणीत, माया त्याची अपरिमीत
छाया, काया देशा देत– सजवित हा भारत ! ॥ १६ ॥
भीमराजाची पुण्याई, धन्य धन्य त्याची माई
गाइ बाळाला अंगाई, जनता ही त्याची आई ॥ १७ ॥
गाउ त्याची ओवी गाऊ, धन्यवाद त्याला देऊ
पायावरी डोकं ठेवू, जन्मोजन्मि ऋणी राहू ! ॥ १८ ॥

# कायदेमंत्री भीम

माझा बाई भीम भला कायदेवाला !
हिंदमाता कंठि घाली मंगलमाला ! ॥ धृ० ॥
राज्ययंत्र हाकतसे घटना चतूर
हिंददेश माझा हा होत स्वतंत्र
झेंडा आभाळास पहा थेट भिडाला ! ॥ १ ॥
धर्मदीप धर्मावरि पाडि प्रकाश
लख्ख करी, चक्क रुढी, ध्येयविकास
हिंदुबिलानेच मनू साफ उडाला ! ॥ २ ॥
दास्यमुक्त करित स्त्रिया, दीनदलीत
कैवारी अबलांचा राजाकेरीट
समतेचा सूर्य हसे पूर्व दिशेला ! ॥ ३ ॥
बुद्ध जणू खुद्द करी दान तपाचे
ध्यान करी योगिराज मानवतेचे
शुद्ध करी सूत्रधार गंधवतीला ! ॥ ४ ॥
स्वातंत्र्य, घटनेचे दान करीत
दीनांना, दलितांना पोटि धरीत
दुष्टांचा काळ उठे घेउनि भाला ! ॥ ५ ॥
देश करी घोष सतत भीमकृपेचा
पावला ग आज पहा देव दयेचा
ठेव सुखी देवा माझ्या कोहिनुराला ! ॥ ६ ॥

# भिम केवढा केवढा !

भिम केवढा केवढा ? भिम आकाशा एवढा !
बुकं शिकला होता किती ? चौदा गाडं ! इद्यापती !
मुखि त्याच्या सरस्वती ! मोप ग्रंथाची संपती !
किती लिहवली त्यानी बुकं ? लइ पिरतीमी इतुकं !
घर ग्रंथाचं आगर ! व्हता इद्येचा सागर !
माया त्याची कोणावर ? घालि जनतेवर पाखर !
हिमालय रात्रंदिन – करि जनतेचं रक्षण !
भिम काय होता नर – भिमराव आंबेडकर !
समतेचा देई धडा – 'लढा लढा आणखी लढा' !
कमि होतं काय भिमा ? प्रिय पत्नी त्याची रमा !
त्यानं केल्या रं लढाया – भटा बामणा गाडाया !
चार वर्णांचं जारण – त्याचं रचीलं सरण !
मनुस्मृतीला कोलित, साद बुद्धाला घालित !
देव त्यानं झोपविला, भगवान ऊठविला !
कुठं त्याची वस्ती बरं ? साऱ्या साऱ्या दुनियेभर !
राज्य कोणाचं भारती ? 'भिमराज्य !' तो भूपती !
त्याचि मोठी कारागिरी ! दान देशा घटना करी !
काय नातं त्याचं व्हतं ? साऱ्या दुनियेचं दैवत !
'जयभीम' कोण करी ? वसे ज्याच्या तो अंतरी !
त्याचि येइल कां रं सर ? छट् बाकीचे वानर !
दिलं कोणी त्या उत्तर ? जग झालं निरुत्तर !
डोकं टेकावं ते हितं ! सारं विश्व बाकी रितं !

## माहेरच्या वाटेवर

गाडीवाले दादा हाका गाडी, वेळ झाला
जाते भिमनगरला – माझ्या माहेराला ! ॥ धृ० ॥
नगरिचा इथुन माझ्या दिसे निळा झेंडा
सभोवती उसळला दलितांचा लोंढा
आज बाई निघाले मी भीमजयंतिला ! ॥ १ ॥
झाडीतुनी सोन्याचे ते दिसति कळत
येई बाई कानावरी भीम जयघोष
बिगी बिगी हाका गाडी वाऱ्यावरी घाला ! ॥ २ ॥
वाटेवरी डोंगर हा कसा उभा मेला
बैलांच्या ह्या शिंगांनी हो बाजू करा त्याला
अशी कशी गाडी बाई पंख लावा तिला ॥ ३ ॥
दिसे माझ्या माहेराची पहा दादा वेस
जमाव हा मुंगीवाणी कोस दोन कोस
उत्सव हा देवाजिचा जगा जो पावला ! ॥ ४ ॥
आनंदाचा पूर बाई उर भरे माझा
पाहीन ग कधी झाले दलीतांचा राजा
पायावर वाहीन मी आज त्याच्या माला ! ॥ ५ ॥
आनंदही पांखरांना गाई वासरांना
थय थय नाचताती जड, जीव नाना
घोष घुमे रानोरानी जयभिम बोला ! ॥ ६ ॥

## सर्वसाक्षी !

देव्हाऱ्यात देव माझा कशा करू काशी ?
तीर्थ नको धुंडाळाया आम्हा दलीतांशी ! ॥ धृ० ॥
सुखदु:खा धावणारा, एका हाके पावणारा
पुण्य उभे पाठीशी हे, भिमराव आम्हापाशी ! ॥ १ ॥
रडत्यास गोंजारील, भुकेल्यास पाचारील
करी धरी पोटी हीन, दिनजन वनवासी ! ॥ २ ॥
देव नाहि देवळात, भीमराव हृदयात
धुंडु कशा देशोदेशी महाजगन्नियंत्याशी ? ॥ ३ ॥
मानवता मानणारा, समभाव जाणणारा
दया, क्षमा, शांतीद्वारा आदिसत्य अविनाशी ॥ ४ ॥
कुलदैवत हे जागे, राखणिला माझ्यामागे !
प्रगटले साक्षात हे, भिमरूप सर्वसाक्षी ! ॥ ५ ॥

## दवंडी

[ अखिल भारतीय पददलितांचे एकमेव कुलदैवत, अभंग श्रद्धास्थान असलेले, बहिष्कृत समाजाचे– अनभिषिक्त सम्राट डॉ. प. पू. बाबासाहेब आंबेडकर यांचे जनमानसातील अभूतपूर्व, अजिंक्य स्थान चिरंतन असून, अखिल जनतेला ते ‘ स्वर्गादपि - गरीयसी ’ म्हणून परमप्रिय व विश्ववंद्य विभूतीच्या स्वरूपात दृग्गोचर होतात. अशा या महाभागाचे– ‘ दिगंत स्वागत, ’ अपूर्व राज्यारोहण समारंभ– मानववंश तर करीलच करील. पण हे देदीप्यमान–‘ राजवैभव ’ टिपण्याचे महद्भाग्य प्रकृतीने– प्रकटपणे, प्रकर्षाने प्रसारित व परावर्तित केले आहे. प्रकृतीची ही प्रभावी मानवंदना राजाधिराजास– आदरपूर्वक समर्पण करून, ही दवंडीची जगजाहीर राजद्वाही सर्व जगाला सहर्ष कंठरवाने उद्घोषित व आमंत्रित करीत आहे. ]

दवंडी द्या, दवंडो द्या, चला मेघांनो या !
द्वाही फिरवा वरिला भूने दलितांचा राया ! ।। धृ० ।।
भीमप्रभूचे राज्यारोहण, लखलखते बघ हे सिंहासन
भूवरि येई हासत सुरगण – आशिर्वच द्याया ! ।। १ ।।
हे पवना तू सांग सुवार्ता, पक्ष्यांनो जा प्रांतोप्रांता !
झाली सांगा भारत माता – नंदनवनशय्या ! ।। २ ।।
हे वृक्षांनो, छत्रे पसरा, वेलींनो या सुमने विखरा !
घाला प्रभुला डोलत वारा – शीतळ द्या छाया ! ।। ३ ।।
उधळा रत्ने या तारांनो, अभिषेक करा गिरिबालांनो,
द्वारपाल व्हा हे शैलांनो, स्तुतिपाठक दर्या ! ।। ४ ।।
घोष करा रे हे मयुरांनो, नौबत झडवा या तडितांनो,
तोफा डागा ज्वालामुखिनो, ताजिम या द्याया ! ।। ५ ।।
ये सूर्या ये खाली आता – अभिवादन कर नरसम्राटा
हासत ये चल रजनीनाथा, अमृत वर्षाया ! ।। ६ ।।
गर्जा सारे ‘ जयभिम ! ’ गर्जा !
भारतभूचा विजयी राजा !
उंच उभारा श्यामलध्वजा !
अमर करो दुनिया ! ।। ७ ।।

## संकल्प

कुठवर आता घोटायाचे? चला होउ द्या सुरू !
मरू, तरू, वा मारू ठरले, दोन हात या करू ! ॥ धृ० ॥
टिळा लावला हा रक्ताचा, विडा उचलला हा तख्ताचा
आणिवाणीच्या या वख्ताचा
रणभेरी फुंकली लढाइत मृत्यूही पत्करू ! ॥
किती जिवांचा सत्यानाश, किती जणांना पडले पाश
आयाबहिणींचा आक्रोश
युगायुगाच्या अत्याचारा लाथेने ठोकरू ! ॥
जुलुम, जबरदस्ती, छळवाद, कानिकपाळी जातीभेद
माजोऱ्यांचा मद, उन्माद
विटंबना ही सहन होइना चवताळे वाघरू ! ॥
किती काळ हे सोसायाचे ? या डुकरांना पोसायाचे !
तोंड भुईला घासायाचे
शिकार पुरती करू तयांना पुरुनी आता उरू ! ॥
गांधीवादी, समाजवादी, जनसंघादी, जनतावादी
या राष्ट्राचे शत अपराधी
हिंदूवेदी वर्णभेदी यांचे पिल्लू पुरू ! ॥
आग शिगेला गेली उसळत, लुच्चे मिसळत आम्हा घुसळत
उडत जाऊदे ढोंगी मसलत
सरशेवटचे शस्त्र वापरू खड्डे त्यांचे भरू ! ॥
दुष्ट समंधा गाडायाचे, वर्णव्यवस्थे उखडायाचे
जातीबंधा तोडायाचे
मरणावाचुनि मरू, अंतरू, यावच्चंद्र उरू ! ॥

# विश्ववंद्य भीमा !

स्वतेजपुंज भास्करा, उदंत ज्ञानसागरा !
प्रकाशवी वसुंधरा, प्रबुद्ध हे प्रभाकरा ! ॥ धृ• ॥
पददलीत मोहरा – प्रसन्नचित्त सुंदरा,
प्रकांड पंडिता शुरा, प्रदीप्तिमान तू हिरा ! ॥ १ ॥
विशाल तू विशेष तू, विपाक तू विधेवरा,
महान तू महौजसा, प्रमाण तू यशोधरा ॥ २ ॥
अनाथनाथ सारथी, कुशाग्र हे महारथी,
अनंत कोटि दिव्यता – दिलेस दान अंबरा ! ॥ ३ ॥
दलीतनायका विरा, विराट रौद्र भासुरा,
अचाट झुंज संगरा – दिलास धाक त्रीपुरा ! ॥ ४ ॥
प्रभावशालि अस्मिता – समानता, अभंगता
मनुस्मृती परंपरा – तू फाडली टराटरा ! ॥ ५ ॥
अनंतकाल भोवरा – फिरे कसा गरागरा
तयास गाडला पुरा – महाविरा, सहोदरा ! ॥ ६ ॥
निखील शुद्ध सत्य तू, असीम नित्य स्तुत्य तू
अजिक्य वीर वाक्पटू – विशुद्ध प्रेम आगरा ! ॥ ७ ॥
हे भीमराज, धन्य तू – सुपूर्द पूर्वपुण्य तू
जगात अग्रगण्य तू – स्तिमीत होतसे धरा ! ॥ ८ ॥
अखील विश्ववंद्य तू – पवित्र, पूज्य, मध्य तू !
महापुरुष बुद्ध तू – नमो नमः शुभंकरा ! ॥ ९ ॥

## आपले घर !

दलित फेडरेशन भिमाचे हेच घरटे आपुले !
बंधुंनो, या या चलारे होत सर्वांना खुले ! ॥ धृ० ॥
या कुणी माणूसपंथी, जातधर्मा वेगळे
'एकविश्व हे कुटुंब' एक सर्वा लेखले ! ॥ १ ॥
आसऱ्याला येत सारी एकत्रीत यामुळे
सर्व जनता घे विसावा; होत सर्वांचे भले ! ॥ २ ॥
येथ थारा, हा निवारा, घेत चारा ही पिले
माय सांभाळी भिमाई, आंधळे, थोटे, लुले ॥ ३ ॥
या श्रमीकांनो, गरिबांनो, नको ते बंगले
आपुल्या रक्ताभिषेके बांधले अन् रंगले ! ॥ ४ ॥
भांडवलशाही कसाई सर्व जग हे पेटले
माउली येथे गरीबा प्रेम येथे साठले ! ॥ ५ ॥
हेच शांतिस्थान सर्वांच्याचसाठी थाटले !
झोपडे साधेसुधे हे यात जग हे आटले ! ॥ ६ ॥
बांधवांनो, भारताची राज्यश्री येथे झुले !
या निळ्या झेंड्यास अर्पू भक्तिभावाने फुले ॥ ७ ॥

# शुभप्रयाण !

[भगवान बुद्ध आपल्या राजमहालात मध्यरात्री विषण्ण मनस्थितीत असताना अनंतातून एक धीर गंभीर आवाज त्यांच्या कर्णरंध्रावर पडत आहे. भगवन् गृहत्याग करण्याच्याच विचारात आहेत. तत्क्षणी पुत्र, दारा, गृह, राज्य या सर्वस्वाचा त्याग करून भगवान बुद्ध झपाटलेल्या अवस्थेत घराबाहेर पडत आहेत.]

सावधान ! सावधान ! कृपानिधान !
प्रबद्ध हो, शुभ प्रयाण !
सिद्धार्था, चल पुढे पुढे ! नको बघू त्या गृहाकडे
नकोच अंत:पुराकडे, नकोस पाहू इकडे तिकडे
सिद्धार्था, चल पुढे पुढे ! ॥ धृ० ॥
विश्वाच्या या विशाल गोली – काय लिहावे याच्या भाली
अवनी सारी दिङमुढ झाली ! काजळलेले घाट
प्रवाश्या, प्रकाशवी ते सूर्यकडे ! ॥ १ ॥
दु:खी, कष्टी सृष्टी रडते ! नाना व्याधींनी तडफडते !
सारी दुनिया आता बुडते ! मुक्त मिळेना वाट
सभोती पहाड, पर्वत, दऱ्या, कडे ! ॥ २ ॥
संहाराचे सत्र भयंकर, अधर्म खाई दात कराकर
भीषण संगर जगभर भेसुर ! रक्ताचे हे पाट !
मनुष्या माणुस रगडी जणू किडे ! ॥ ३ ॥
'धावा, धावा,' हे आक्रंदन ! सिद्धार्था, जा जा जा धावुन
गंधवतीला जीवन – रक्षण सोन्याचे ते ताट
दयाघन, वाढुनि ठेवी जगापुढे ! ॥ ४ ॥
मार्गप्रतिक्षा धरती करते, अभय तिला दे तर ती तरते
धम्मचक्र हे ठेवी फिरते–'धम्मं सरणं' पाठ
जगाच्या कल्याणाचा तुझ्याकडे ! ॥ ५ ॥

# सांगावा

[आणि नंतर भगवान बुद्ध, आपला सारथी छन्ना, याच्याबरोबर दूरदूर निघून गेले. आपली वस्त्रे, भूषणे छन्नाजवळ देऊन, त्यांनी आपल्या तरवारीने स्वतःचे केस कापून मुंडण केले. शेवटी सारथ्याची समजूत घालून, त्याला परत नगरास जाण्याची ते आज्ञा करीत आहेत. त्याचप्रमाणे निश्चयपूर्वक शेवटचा कळकळीचा सांगावा ते प्रेमाने सांगत आहेत.]

छन्ना, जा परतुनि माघारी !
सांग, म्हणावे ' गौतम आहे सकलांचा आभारी ' ॥ धृ० ॥
आणि सांग जा यशोधरेला, राहुल बाळा, सकला सकला
गौतम आता तुम्हा मुकला !
' चिरंजीव हे मरणे, सरणे धम्मपदाशेजारी ! ' ॥ १ ॥
दुःखाश्रूंची फुले फुलविणे ! सत्य, अहिंसा पथ अनुसरणे
मानवतेचे हे बघ लेणे !
' जीवनदिक्षा देणे जगता, शांतीच्या दरबारी ! ' ॥ २ ॥
' सद्धर्माची समता शिकवण, मानवतेची पूजा साधन
हेच जगत कल्याणाराधन ! '
मानवतेच्या महान धम्मा शोधिल दुनिया सारी ! ॥ ३ ॥
' धम्मं सरणं ' हीच प्रतिज्ञा ! ' ' संघं सरणं ' ही धर्माज्ञा !
निर्वाणाप्रत नेई सूज्ञा !
अखंड तेवत राहिल ज्योती मानव्याच्या दारी ! ॥ ४ ॥
सौख्यासाठी दुःख गिळावे !
दुःखावाचुनि सौख्य मिळावे !
कोणालाही हेच कळावे
याच्यासाठी धम्मापोटी माझी श्रद्धा भारी ! ॥ ५ ॥
लोकांसाठी मार्ग नको का ?
एकासाठी अश्रु तरी का ?
चालुनि येइल सौख्य घरी का ?
सांग जना अभिवादन छन्ना, ने ही वस्त्रे सारी ! ॥ ६ ॥

# शोध

[ भगवान बुद्धाने अपार परिश्रम करून, हटयोग, ध्यान-धारणा, तपश्चर्या व समाधी लावून देखील त्यांना- ईश्वराचा सुगावा लागला नाही. शोध शोधून मुळात- नसलेला परमेश्वर, मृगजळाच्या मागे धावणारे, स्वप्नसृष्टीत मश्गूल होणारे अंधश्रद्धाळू, भोळया भाबडयांचा व कावेबाज लुच्चांचा हा फतवा त्यांनी वेशीवर टांगला आहे.]

मी शोधिले परंतु नाही तुझा ठिकाणा !
येई मनात किंतू, मानू कसे प्रमाणा ? ॥ धृ० ॥
मी पाहिलेहि नाही, की ऐकलेहि नाही
येथे असेल काही हे भासलेहि नाही
तेव्हा कशास माना ? नाही तुझा ठिकाणा ! ॥ १ ॥
ती ध्यानधारणा ती, केली तपे, भ्रमंती
नाना उपास, शांती – गेली उडून भ्रांती
तेव्हाच येइ ध्याना – नाही तुझा ठिकाणा ! ॥ २ ॥
कोठे असे स्वयंभू ? कोणास काय सांगू ?
मूळात जेथ पंगू – त्याच्यासवेच रांगू ?
ते चांगले नव्हे ना, नाही तुझा ठिकाणा ! ॥ ३ ॥
पक्वान्न रोज खाई – उपवासि मात्र राही !
जे चाखलेच नाही – मारू कशी बढाई ?
जे सत्य तेच वर्णा, नाही तुझा ठिकाणा ! ॥ ४ ॥
आली प्रचीत मजला – ते सांगतो जगाला
त्यांतून जे तुम्हाला – पटणार तेच बोला !
मी सांगतो असे ना, नाही तुझा ठिकाणा ! ॥ ५ ॥
विश्वास फक्त ठेवा – तो अंधही नसावा
लोकांस मार्ग दावा – तो स्पष्टही दिसावा !
घ्या जे पटेल कोणा, नाही तुझा ठिकाणा ! ॥ ६ ॥
शोधू नका मुळीच – ज्याला नसे मुळीच
तो स्वर्ग, कल्पवृक्ष – कुणि पाहिले समक्ष ?
ही स्वप्नसृष्टि जाणा – नाही तुझा ठिकाणा ! ॥ ७ ॥

माणूसकी असावी – ती माणसांत यावी !
त्या माणसास द्यावी – ज्या माणसास ठावी
या माणसांत आणा, नाही तुझा ठिकाणा ॥ ८ ॥
हे प्राणिमात्र यांना–
यांनाच फक्त माना !
सेवा करा नि जाणा–
यांना जित्या जिवांना !
सांगा निरोप त्यांना–'नाही तुझा ठिकाणा ! ' ॥ ९ ॥

# मी माणसास मानतो !

मी माणसास मानतो ! ना ईश्वरास जाणतो !
मी माणसांत आणतो – तो देव काय कोण तो ? ॥ धृ० ॥
ही माणसेच निर्मिती, पिशाच्च, देव आकृती
ही कल्पना, कलाकृती – घरात भूत आणतो ! ॥ १ ॥
जो दैववादि, आळशी, तयास देव दे उशी
जो पंगु, अंध तादृशी, वृथाच धूळ उडवितो ! ॥ २ ॥
जे दृश्यमान ते खरे, ती पोकळी खुळी ठरे
जे नाहि ते कसे बरे, खरे धरून चालतो ? ॥ ३ ॥
जे दुःख माणसांतले – आगीत तेल ओतले !
आम्हांस देव घातले त्या कोण हो जुमानतो ? ॥ ४ ॥
ही भूक माणसांतली स्वार्थांध, लोभि जाहली !
तृष्णा महान वाढली – तो यामुळे उनाडतो ! ॥ ५ ॥
कर्तृत्ववान माणुस – त्या पाहिजेच अंकुश
होताच स्वैर राक्षस – कोणास भीक घालतो ? ॥ ६ ॥
शेता हवेच कुंपण, त्या सागरास बंधन
हा धम्म हेच साधन तो माणसास रोखतो ! ॥ ७ ॥
ही माणसे महानदी, होती हिरे कधी कधी
अब्धी कधी मधी जधी, शांती करी प्रदान तो ! ॥ ८ ॥
दुष्कर्म–धूर ओकतो, माणूस त्यात झाकतो
जो कृष्णमेघ झोकतो – तो सूयसा प्रकाशतो ! ॥ ९ ॥
सन्मार्ग मानवी खरा – तो तेवढा तरी धरा
ही आपुली परंपरा – हे धम्म सत्य सांगतो ! ॥ १० ॥
परदुःख दुःख आपुले, समदुःख ज्यांनि पाहिले
त्यालाच वेदना कळे, जो आपुल्यात पाहतो ! ॥ ११ ॥

## वचनपूर्ती !

स्वनेत्र बुद्धा शांत झाकले !
अडिच हजार वर्षे मिटले !
नागपुरी ते नेत्र उघडिले !
नवबुद्धाचे हसरे ध्यान !
'बुद्धं सरणं' – पुनरुत्थान ! ॥ १ ॥

"अडिचहजार वर्षांनंतर–
जन्म घेइन भारतभूवर !"
वचन दिले, आले प्रत्यंतर
रूप पालटे करुणानिधान
करुनी भिमवेशा परिधान ! ॥ २ ॥

दुःखीतांच्या सौख्यासाठी
स्वसुखा, ऐश्वर्याला लोटी
भोळी जनता घेउनि पोटी
'बहुजन हिताय' अनुसंधान !
'धम्मं सरणं–' घोष महान ! ॥ ३ ॥

अवनीवरती डोंब उसळला
कोणी नाही विझवू शकला
एक हिमालय पेटुनि उठला !
दिनदलितांचे करि परित्राण !
'संघं सरणं–' पर्व महान ! ॥ ४ ॥

कालचक्र हे थांबविण्याची
छाती कसली ती वज्राची !
उत्तर, दक्षिण, पश्चिम, प्राची
जिंके अवनी, हो बहुमान !
'धम्मं सरणं'– सर्व समान ! ॥ ५ ॥

शर्थ करी, सामर्थ्यपणाला
हिमालयावरि चढवी किल्ला !

फडकवि तेथे झेंडा अपुला !
सूर्य प्रगटला प्रकाशमान !
‘ भीमं सरणं ’– घोष महान !    ॥ ६ ॥
मूक समाजा बोलायाला–
तूच लाविले चालायाला
लालनपालन करुनी त्याला–
तूच दिले भीमा, जिवदान !
‘ बुद्धं सरणं ’– मंत्र महान !    ॥ ७ ॥
नागपुरी ते उघडुनि डोळे–
जगा आंधळ्या डोळस केले !
दृष्टि जगाला देउनि मिटले !
होय भिमाचे महानिर्वाण !
नयन पुन्हा उघडा भगवान !    ॥ ८ ॥

## धन्य महात्मा फुले

धन्य महात्मा फुले ! ज्योतिबा, धन्य महात्मा फुले !
ज्योती ज्योती उजळे प्रीती – जीवन ज्योती जळे ! ॥ धृ० ॥

सत्यवान सति सावित्री ही–
युगुल असीव्रत खडतर घेई
जनसेवेला जीवन वाही !
विहीर, घर आपुले दलीतांसाठी केले खुले ! ॥ १ ॥

ज्ञान जगाला देई ज्योती
मातीतुनि तो काढी मोती
पाटी पुस्तक देई हाती
चिखलातुनि ते मानवतेचे ज्ञान कमल उमलले ! ॥ २ ॥

गोरगरिबांमाजी रमला
दीनदलीतांसाठी श्रमला
देव, दलीता दुसरा गमला
त्यक्त समाजासाठी त्याचा जीव हले, गलबले ! ॥ ३ ॥

सनातन्यांची पकडी शेंडी
पाठीवरती ‘आसुड’ ओढी
बंड रुढींचे मोडी, गाडी
पगडी पगडी केली उघडी, कानच पकडी, पिळे ! ॥ ४ ॥

नवबुद्धाच्या तृतीय गुरुची
नीतीमूल्ये, शिकवण त्यांची
शिरसावंद्य तत्त्वे साची
बंधुत्वाची, मानवतेची दिव्य सजावट खुले ! ॥ ५ ॥

‘गुरू, महात्मा’ त्याची वाणी–
गर्जत होती वाघावाणी !
गडी बहाद्दर, खंबिर, ज्ञानी
मृत्यूलाही लाजवुनीया परतोनी लावले ! ॥ ६ ॥

समतेचा तो फिरवी नांगर
सत्याचे बिज पेरी भरपुर
शेतकरी हा, नितांत सुंदर–
सुविचाराचे, सत्कार्याचे फुलवी, पिकवी मळे ॥ ७ ॥

जातीपातींचा आडपडदा, मनुस्मृतीचा पाडी मुडदा !
करी रुढींचा चेदामेंदा
ब्राह्मण्याच्या चातुर्वर्ण्या पायाशी झुकविले ! ॥ ८ ॥

गुलामगिरिचे जू मानेवर, वेठबिगारीभूत उरावर
हिंस्र जनावर जगत जनांवर
धर्म नि पीतर, क्रूर, कलंदर नर्काचे हे तळे ! ॥ ९ ॥

देशाचा हा खंदा नेता, काळ भटांचा कडवा होता
दीनदलीता आश्रयदाता
'सत्यशोधका' सत्य जगाला प्रेम दिले, शिकविले ! ॥ १० ॥

जगद्‌गुरुचे स्थान अपूर्व !
सत्ययुगाचे महान पर्व !
जागृत केले पश्चिम–पूर्व !
परमपूज्य बाबांनी त्यांना गुरुस्थानी मानिले ! ॥ ११ ॥

ज्योतीची ही जीवनज्योती–
बुद्धाची ती 'करुणा, प्रीती'
देशाची धनदौलत, पोथी !
ज्योतीबांची पुण्यतिथी ती, पूज्य धरु पाउले ! ॥ १२ ॥

## महाडची मोहीम !

पडे छावणी सूप वाजले, सजले सैनिक सिंह खडे !
भिमसेना कुच करित चालली– महाडच्या त्या तळ्याकडे ! ॥ धृ० ॥

मोहिम ही चवदार तळ्यावर, भिमराजाच्या भीमबळावर
स्पृश्यांचा निबंध जळावर
मनुस्मृतीच्या बांडगुळावर कडवा हल्ला जबर पडे ! ॥ १ ॥

वीस मार्च सत्ताविस साली– प्रचंड सेना रणा निघाली
विरश्रिने ती पुरी पेटली
सरसेनानी भीमबहाद्दर– चाले आघाडीस पुढे ! ॥ २ ॥

पहा तळ्याचे येथिल पाणी, पिऊ देईना आम्हा कोणी
जात किती ही माणुसघाणी
करणि किती हो लाजिरवाणी, जाच, जुलुम अन्याय घडे ! ॥ ३ ॥

कुत्रि मांजरे कितितरि प्राणी– पितात पाणी, लोळत वरुनी
पण आम्ही तर माणुस असुनी
अस्पृशा का बंदी म्हणुनी ? कसला यांना माज चढे ? ॥ ४ ॥

माणुस म्हणुनी जगण्यासाठी– हक्क नसावा ? अजबच गोष्टी !
नऊदहा कोटी संख्या मोठी
परी गुलामित ही वांझोटी– सडत पडत घाणीत किडे ! ॥ ५ ॥

समतेचा या हक्क बजावा, माणुसकीला जागे ठेवा
भेदभाव कसलाहि नसावा
या हिंदूंना हटवा, रुढिचे त्वरित पेटवा मरत मढे ! ॥ ६ ॥

चातुर्वर्ण्याची ही चौकट, मोडा, पाडा, उडवा हे तट
मनुस्मृतीचे मोडा पेकट
उभे जाळती ब्राम्हण हे भट– बहिष्कृतांची राख उडे ! ॥ ७ ॥

ब्राम्हण्याची टिटवी फिरते, या देशाला सटवी धरते
भटकी तरते, वटकी मरते !
पुरी अवदसा घरात शिरते, स्मृती, पुराणांचे लफडे ! ॥ ८ ॥

सरणावरच्या पुरणावरती – सगळी सोंगे ढोंगे चरती !
ब्राम्हण्याचा ठेका धरती
सातपिढे हे म्हणती वरती – 'अमुच्या कानी सात खडे ! ' ॥ ९ ॥

शूरांनो, महशूर तुम्ही तर, रणगाजी खंबीर बहाद्दर !
'महार पलटण ' दे प्रत्यंतर !
रक्ताचे ते सडे शिंपिले – नरवीरांनी चहुंकडे ! ॥ १० ॥

या देशाची रीत भयंकर, दलितांचे हे काळ निरंतर
सनातनी हे महाबिलंदर
पिळती धर्माच्या चरकावर – अस्पृश्यांची हाडे हाडे ॥ ११ ॥

हक्कासाठी आम्ही लढतो, तत्त्वाकरिता झगड झगडतो !
पायाखाली रुढि रगडतो !
येइल आडवा त्याला तुडवा, समशेरिस समशेर भिडे ! ॥ १२ ॥

तरी शुरांनो, व्हा रे जागे, रक्त आज हे पाणी मागे !
द्वंद्व यापुढे स्पृश्यांसंगे !
हजार सोंगे सोडित भुंगे, भिम सांगे त्या देइ धडे ! ॥ १३ ॥

स्पृश्य खवळले फिरवित डोळे
सैन्य उतरले तळयात सगळे
जळ ते त्यांनी प्राशन केले !
तद्नंतर रक्ताने न्हाले !
विजयी झाले विर निधडे ! ॥ १४ ॥

तळे प्रसादे पवित्र झाले !
पादतीर्थ त्या सार्थ मिळाले !
भीमकृपेने सजीव झाले !
चोखोबाने अमृत केले––
शुद्ध तसे हे नवल घडे ! ॥ १५ ॥

# काळाराम वेढा, गाई पन्नाशीचा पाढा

दार ठोठवी नाशिकच्या त्या काळचारामाचे
विराट दर्शन वज्रमुठीच्या घडले भीमाचे ! ॥ धृ० ॥
बालिस्टर तो जाब विचारी काळचारामाला
काळचारामाच्या त्यां कर्मठ भटाभिक्षुकाला
सवर्णियांनी कहर उडविला चढवीला हल्ला
दगड, विटा अन् लाठ्या काठ्या, कवट्या धरणीला
महान कडवे जन आंदोलन विसाव्या शतकाचे ॥ १ ॥
मंदिरप्रवेश नांदी, बंदी दीनदलीतांना
माणुसकीच्या हक्कासाठी सजला भिमराणा !
सवर्णिया आव्हान उघड दे बेगडि हिंदूंना—
'समान हक्कासाठी अमुचा हा जाहिरनान ! '
सन एकोणिसशे तीस सालचे संगर नाशिकचे ! ॥ २ ॥
भयप्रद संघर्ष पेटला प्रळयकाळ आला
पानीपत-रणकुंड पेटले रक्ताच्या धारा
हाणा, मारा एकच गिल्ला आकाशा भिडला
जातकुळीच्या जातीवंतांचा धुव्वा उडला !
नामुष्कीचे नाक कापले धर्मपिसाटांचे ! ॥ ३ ॥
पंढरपुरवर केली होती चोखाने स्वारी !
चोखोबाने अमृतशुद्धी स्वर्गाची केली !
'हिंदुकोड' बिल, धर्मशुद्धी भीमाने केली !
त्याच अमृता भीम धुरंधर अमरत्वा घाली !
'मानवतेचा महान मानव' कर्तृत्व त्याचे ! ॥ ४ ॥
या घटनेचे सूचक स्मारक अर्धशतकाचे !
भारतियांचे, भवितव्याचे, भाग्यविधात्याचे !
मानवतेचा अमूल्य ठेवा जतन करा याचे
सुस्वागत दिग्विजयि अशा या सुवर्ण सोहळ्याचे
'सुवर्णउत्सव' श्रेय भिमाचे—घटनाकाराचे ! ॥ ५ ॥

## धि:कार ! धि:कार !

पददलितांचा गळा गोवला, पुरा भोवला पुणे करार !
पायी तुडवा, नदीत बुडवा, करा हिरीरीने धि:कार ! ॥ धृ० ॥
बत्तीस सालातिल बत्तीशी, त्रेसष्टीची ती पस्तीशी
काँग्रेसवासी टाचा घाशी
'स्वतंत्र मतदार संघ' त्यासी, विरोध मी करणार ॥ १ ॥
मेलो तरि चालेल परंतू, 'सवतासुभा' ही वस्तुच विस्तू
पेसविन 'हरिजन' राहू–केतू
उपोषणाचे पिल्लू सोडिन, जिभ हसडुन मरणार ॥ २ ॥
भिमरावाला वेठिस धरले, आता– मग ते होइल– भरले
डॉक्टर अपुल्या हाती उरले
पाय भिमाचे धरले,– 'काळिज' काढुनि द्या दिलदार ॥ ३ ॥
प्राणाची द्या भीक विनवणी, करित याचना अन् मनधरणी
देश धुरंधर – राजकारणी
परिस्थिती हो केविलवाणी – त्वरा करा उपकार ॥ ४ ॥
गळा उतरुनी देइ स्वत:चा – भीम बहाद्दर भारतभूचा
कर्ण उदार दिलदारीचा
'उठा, दिले जिवदान' बळी दे दान बामणा, म्हार ॥ ५ ॥

## बौद्धमय भारत !

बुद्धं सरणं हीच घोषणा ! धम्मं सरणं हीच गर्जना !
संघं सरणं याच भाषणा !
भीमं सरणं या परित्राणा, बौद्धांचा जयघोष !
जगाला होत परम संतोष ! ॥ धृ० ॥
पंचशिलाची सुवर्ण संधी, प्रज्ञा, करुणा ती संबोधी
आदी, मध्य, समता सांधी
या जगताची होई शुद्धी सत्याचा परिपोष ! ॥ १ ॥
इथे नांदते मंगल शांती, पावित्र्याची तेवत ज्योती
ज्ञान रवीचा उदय प्रभाती
दुःखमुक्त ही होई पृथ्वी, प्रीतीचा उद्‌घोष ! ॥ २ ॥
धम्माचे अभिसरण–प्रवर्तन, मांगल्याचे महान दर्शन
विद्यार्चन सन्मार्ग प्रबोधन
मूर्त यशोधन मुक्ती साधन मानवतेचा कोष ! ॥ ३ ॥
सुवर्णयुग ये भीम पुरस्कृत
सुकृत स्वीकृत दान अधीकृत
विश्व धन्य हो देश अलंकृत
अखंड भारत बौद्धमय हो यश लाभो भरघोस ! ॥ ४ ॥

## धम्म सीमोल्लंघन !

सीमोल्लंघन धर्मोल्लंघन नागपुरी झडले !
धम्मचक्रप्रवर्तन भिडले भीमायन घडले ! ।। धृ० ।।
अभिधम्माचे, भगवंताचे पाउल हे पडले
नवबौद्धांचे निशाण भारतभूवर फडफडले ! ।।
स्वप्न कधी जे नव्हते पडले कोडे उलगडले
भाग्यविधात्या भारतवर्षा सोने सापडले ! ।।
बौद्ध जगाला धम्मप्रवर्तन भारी आवडले !
भगवंताचे मायभुमीचे नाते हे पडले ! ।।
भीष्मप्रतिज्ञा भीमाची तारांगण गडगडले
चातुर्वर्ण्याचे डोलारे कोसळले–पडले ! ।।
त्रेधातिरपिट हिंदुत्वाचे मुख काळे दडले !
माणुसकीच्या मुर्दाडांना पापच हे नडले ! ।।
पददलितांचे दैवत बाबा जन्मभरी लढले
प्राणपणाने लढले हासत जीवन पाखडले ! ।।
यत्न भगीरथ शर्थ शहामत गिरिशिखरी चढले
थेट चढवले निशाण चढले आकाशा भिडले ! ।।
बुद्धानंतर सीमोल्लंघन हे बौद्धांकडले !
बुद्धं सरणं– भारतवर्षा पाउल हे पुढले ! ।।

## सुसज्ज दलभार

नवबौद्ध सिद्ध चहुकडे – विर खडे, चला पुढे,
घनघोर समर लढवायाचे
प्रतिमहाभारत घडवायाचे ! ॥ धृ० ॥
रणरंग चढे, समशेर भिडे, शिरकाण उडे
मर्द फाकडे चित्ते बछडे
लढत लढत, थडथडत, उडत – रिपुरक्त कढत उडवायाचे ! ॥ १ ॥
उन्मत्त रिपू, टप्प्यात टिपू, निप्पात घडे
लोळवू हाडे जिकडे तिकडे
चिडत चिडत, उलगडत भिडत, नरमुंड खुडत तुडवायाचे ! ॥ २ ॥
धरुया नरडे, चिरुया जबडे, तोडु कंबरडे
चाळणी करु धिरडे धिरडे
उडत उडत, कडकडत चढत, गरदडत, वढत बडवायाचे ! ॥ ३ ॥
उत्तुंग कडे मार्गात खडे
येताच पुढे पडतील धडे
घालु या सडे घडेच्या घडे
बेधडक खडक उखडायाचे ! ॥ ४ ॥
बौद्ध खडे सर्वांत पुढे
रणि देह पडे झणि मुक्ति घडे
करु भारत बौद्ध प्रकाश पडे
स्वनिशाण नभी चढवायाचे ! ॥ ५ ॥

## निळा झेंडा

झेंडा निळा भिमाचा किल्ल्यावरी पहा ग !
संदेश बाइ त्याचा साऱ्या जगास सांग ! ॥ धृ० ॥
माणूसकीचसाठी राही खडा सदैव
वेडचा गरीबडचांना देई धड सुदैव
स्वातंत्र्यरक्षणाचा उचली विडा अहा ग ॥ १ ॥
'माझा समाज सारा उंचावरी असावा'
'साऱ्या जगासमोरी सन्मान्यतेस यावा'
सांगी अशीच याची, भारी दिशा दहा ग ॥ २ ॥
माझ्या पहा भिमाचे पाईक कोटकोटी
राजा शुराविरांचा प्रेमे धरीत पोटी
'जयभीम' लक्ष लक्ष झेंडचा फुले वहा ग ! ॥ ३ ॥
झेंडचा, असाच नीट जा उंच उंच थेट !
त्या गौरिशंकराला जाऊनि खुद्द भेट !
अन् सांग भारताचा 'जयभीम' राज्य माग ॥ ४ ॥

## ध्वज उंच उभारा

ध्वज उंच उभारा ! ध्वज उंच उभारा !
जयभीम पुकारा ! जयभीम पुकारा !
फेडरेशन दलितास जगी एक निवारा ! ॥ धृ० ॥
भगवान बुद्ध देत आशिर्वाद दलीता
झाली तशी प्रसन्न पूज्य भारतमाता
वर देतसे तपोनिधीस विश्वविधाता
'भिमदेव अमर होत राजदंड स्विकारा !' ॥ १ ॥
अविनाश अहा तख्त पहा राष्ट्र प्रहासे
नवहिंद किरिट भूमिवरी तेज प्रकाशे !
भिम भाग्यवंत राष्ट्रकुलाभूप विलासे !
जयकार असो ! सतत झडो विजयनगारा ! ॥ २ ॥
हे नीलध्वजा, नित्य तुला लाख प्रणाम !
हे प्राण तुझ्यासाठी कोटकोटि इनाम !
त्वत्छत्र असो देश दिसो दिव्य, महान !
गगनात चढो सार्वभौम नील फरारा ! ॥ ३ ॥

## गरुडभरारी !

ही तडफदार झडप मारि गरुडभरारी !
झाले सर्प फरारी ! ॥ धृ० ॥
सर्प बिळी भूमितळी पार पळाले
वीष विषा त्यांस खरे खास मिळाले !
रानोमाळ पळत सुटत गुंड, टकारी
ताणी शूर शिकारी ! ॥ १ ॥
दिल्लिवरी स्वारि करी तख्त गडाडे
गर्जतसे मेघ जथू तोफ धडाडे
'शासनकर्तेच होउ' बंड पुकारी
फुंकी भीम तुतारी ! ॥ २ ॥
शांतिसभा कौरवांचि भरलि विराट
भीम प्रतीपक्षा करी चीत, चकीत !
राजचतुर घटनासभेस जाब विचारी
जिंकी कृष्णमुरारी ! ॥ ३ ॥
दिनमणी पाडितसे लख्ख प्रकाश
धुंद करी चंद्र निळेभोर आकाश
कोहिनुरा, तेज तुझे दिव्य, करारी
राणा कुंजविहारी ! ॥ ४ ॥
साऱ्या जगावरति असो राज्य भिमाचे !
जागृतिचे, उन्नतिचे, माणुसकीचे !
लाभे जगद्वंद्य आम्हां थोर पुढारी
त्याचे आम्ही पुजारी ! ॥ ५ ॥

# ती चिता–तिची गाथा !

चंदनाच्या त्या चितेची लाकडे मी वाहिली
भरसमुद्रा लागलेली आग मोठी पाहिली ॥ धृ० ॥
आग आकाशा भिडाली – प्रळयकाळ जाळ घाली
डळमळीत पृथ्वि झाली, तळमळे की मासळी ! ॥ १ ॥
पददलीत, बौद्ध जनता – करि जोहार जळता जळता
कोळश्यांची खाक होता – राख मागे राहिली ! ॥ २ ॥
पेटलेले ते निखारे – भस्म करती देह सारे
आग जाळी, डोंब उसळे – पसकरोनी राहिली ॥ ३ ॥
देशभर वणवाच वणवा – आंच लागे गावोगावा
गावगन्ना– सर्वा सर्वा – कढवि कढई काहिली ! ॥ ४ ॥
शुद्धि ना कोणा कुणाची, दुःख ग्रासी आग वेची
होरपळल्या पांखरांची – अंग अंगे भाजली ! ॥ ५ ॥
शोकवार्ता ऐकताची – जो जसा होता तसाची
पोचला राजगृहासी – रीघ मोठी लागली ॥ ६ ॥
ओरडून ओरडून – कंठ गेले ते सुकून
ऊर घेताती पिटूनी – छाति त्यांची फाटली ! ॥ ७ ॥
व्ही. के. इंजे, मी, इतरही – लाकडे वाहून नेई
चंदनाचे स्वर्ण होई – परिस देई सावली ! ॥ ८ ॥
एक दृश्य पाहिले ते – देवतेचे दिव्य होते
पोटचे ते पोर मरते – ठेवि घरि ते मावली ! ॥ ९ ॥
भीमयात्रेसाठि थेई – ओक्साबोक्सी रडत आई
बडवुनी ते भाळ घेई, आसवांनी माळली ! ॥ १० ॥
पुत्रशोका आवरोनी, भीमशोके येत ग्लानी
हो जिवाचे पाणि पाणी – नेत्रधारा लागली ! ॥ ११ ॥
बडविते ती ऊर माता, रडविते लोका-समस्ता
गाववाले करित चिंता, करुनि समजुत पाहिली ॥ १२ ॥
पोटचे ते पोर मरुन – सारिते प्रेता धरुन
ती निघे दुःखा धरुन – बाबासाठी ती आली ! ॥ १३ ॥

हा जगाचा बाप गेला ! तो आभाळाएवढाला
काय करु माझ्या मुलाला ? याने माया लावली ! ।। १४ ।।
चालला हा सूर्य अस्ता – होवु द्या त्याची व्यवस्था
मग मुलाच्या बंदोबस्ता – लागु घरि गेल्यावरी ।। १५ ।।
प्रेम ये का मोजता हे ? काय तुलना यास आहे ?
थांग ना, आकाश का हे ? काय त्याची सावली ? ।। १६ ।।
केवढे काळीज मोठे ! यास बसवावेच कोठे ?
त्याग, माया थोर वाटे – उच्चकोटी-पातळी ! ।। १७ ।।
प्रथम माझा भीमराजा, सर्व जनतेचा कलीजा
त्याच्यानंतर पुत्र माझा – त्याचि का मातब्बरी ? ।। १८ ।।
काय याला मोल द्यावे ? काय या प्रेमा म्हणावे ?
मूर्त वात्सल्य गणावे । धन्य माता माउली ! ।। १९ ।।
सी. डी. सोनवणे म्हणून – एक हाताचा सुजाण
बाबा त्याचे पंचप्राण, श्रद्धा त्याची खरिखुरी ।। २० ।।
सातानवसे पोर झाले – अन् अचानक तेहि गेले !
त्याच दिवशी बाबा आले – महासभा आयोजली ।। २१ ।।
लोक जमले सी. डी. बोले – व्हायचे ते झाले गेले
राहु द्या हे मूल मेले – माति करु मग चांगली ! ।। २२ ।।
बाबासाठी देउ प्राण, ती सभा सोडील कोण ?
मग व्यवस्था मी करीन, राहु द्या या तोवरी ! ।। २३ ।।
हाय माझा पुत्र गेला ! पण किती कवटाळु त्याला ?
बाबा आले भाषणाला – ऐकु द्या ती वैखरी ! ।। २४ ।।
वाहिले सर्वस्व ज्याने – या समाजा, त्या भिमाने
त्या विसरणे-द्रोह करणे – वृत्ति असली ना बरी ।। २५ ।।
प्रेत सारोनी घरात, दुःख दाबोनी उरात
त्या सभेला शीघ्र जात, भाषणे ती ऐकली ! ।। २६ ।।
ऐकण्याला भीमवाणी, पोटच्या गोळचा न मानी
केवढी ही त्यागश्रेणी – ही जगाच्या वेगळी ! ।। २७ ।।

धन्य त्याची त्या भिमाची – माणसे ही माळ ज्याची
ती जिवाची काळजाची, भीम शब्दा जागली ! ॥ २८ ॥
जिंकिले हे विश्व ज्याने – धन्य त्याची त्या भिमाने
प्रेम संपादीत सोने – प्रीति ज्योती लावली ! ॥ २९ ॥
धन्य आम्ही दास त्याचे – दलित जगताच्या भिमाचे
भाग्य अंत्यदर्शनाचे – पर्वणी ती लाभली ! ॥ ३० ॥
विश्व सारे अश्रु ढाळी ! चंदनाला आग जाळी
भीमसम्राटा सलामी – वाहिली श्रद्धांजली ! ॥ ३१ ॥

# निर्वाणीचा लढा !

निर्वाणीचा लढा, भिमगडा वेढा पडला, उडा,
कोसळला हिमकडा, वीर हो, पेटुनि बाहेर पडा !
नावनिशाणी-खडा – ही पिडा कायमची गाडा ।
प्रलयाला या भिडा, लढा, हा पहा उचलला विडा ! ॥ धृ० ॥
बुद्ध, भिमाला साक्षी ठेवुन
आहुतात्म्या श्रद्धांजलि वाहुन
ऋणि आमरण त्यांचे राहुन
सरणावरती चढा, पडा वा पाडा, गाडा धुंडा ! ॥ १ ॥
चक्रव्यूह हा बलदंडांचा
मोडा तोडा थयथया नाचा
खिंडित कोचा, टिपूनी वेचा
तुटुनी आता पडा, धडका पाडा, फाडा धडा ! ॥ २ ॥
बौद्ध–दलीतांचे शिरकाण
समूळ निर्दाळण, उच्चाटन
चालच परशूरामापासुन
गिरवित आले धडा, माकडा हाती हा काकडा ॥ ३ ॥
निज धर्माच्या नावाखाली
किती मारिले यांनी वाली
होळि घरांची– जिवंत जाळी
पेटविले धडधडा, ओरडा, हंबरडा, तडफडा ॥ ४ ॥
किती फोडले डोळे यांनी
विवस्त्र केल्या आयाबहिणी
अब्रू लुटली चांडाळांनी
चिडा, उडा थडथडा, घ्या सुडा, चिरडा या बेरडां ! ॥ ५ ॥
करा पुरा निप्पात –धुलवडा
पकडा, उखडा, झोडा, जखडा
उघडा रे वाघांनो, जबडा
कडकडा फोडा हाडां, ढलगडा, फाडा या बोकडां ! ॥ ६ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
शाखा (स्थळ प्रत)

देश जयांचा त्यांना गोळी ! घरमालक जो त्याची होळी
शिरजोरांची पिकली पोळी !
चोरांची ही काळी टोळी – झोळी अपुली भरे ! ॥ ॥ ९ ॥

देशावर चोरांची पक्कड म्हणुनी अमुची चाले परवड
चंगळ चाले यांची फक्कड
उत्तरभारत बिहार वेचित सुपातले हरभरे ! ॥ १० ॥

कुणी आमुचा नाही वाली, पहात आलो यांच्या चाली
अखेर येइल यांची पाळी !
त्या राखेतिल तेच निखारे देतिल या तोबरे ! ॥ ११ ॥

## सर्वव्यापी भीम !

आज गेलासी निघोनी, नित्य तुजला पाहतो !
आमुच्या श्वासातुनी या, तू सदैव वाहतो ! ॥ धृ० ॥
दीप साक्षात्कार देई, वृक्ष सारे देत ग्वाही
साक्ष पुष्पांतून होई, भीम येथे राहतो ! ॥ १ ॥
पंकजाचा हा पुरावा, पर्वतांचा सार्थ ठेवा
तू कसा नाही म्हणावा – अंग अंगी नाहतो ॥ २ ॥
बोलशी विद्येतुनी तू – ज्ञानगंगा जात ओतू
राजकार्यी तूच तू तू, सर्व स्थानीं पोहतो ! ॥ ३ ॥
देशव्यापी, धर्मव्यापी, विश्वव्यापी तू प्रतापी
ओळखाया खूण सोपी, बुद्धधामी राहतो ! ॥ ४ ॥
कार्यसिद्धी काय सांगे ? तू दलीतांच्याच संगे
ही तुझी बहुवीध अंगे, देश सारा चाहतो ! ॥ ५ ॥
हो सदा संपर्क आम्हा – पाठिशी, सांगाति भीमा !
लाख 'जयभिम !' घे प्रणामा ! नित्य पुष्पे वाहतो ॥ ६ ॥

## – इतिश्री

ग्रंथावरि पडले शेवटचे हे पान !
नवबुद्धाचे हे होत महानिर्वाण ! ॥ धृ० ॥
पूर्ण झाली भीमगाथा – जी जगाला बुद्धगीता
जो जगाला वंद्य होता, तोहि गेला प्राण ! ॥ १ ॥
शून्य झाले शून्य सारे ! पोरकी ही होत पोरे !
फोडती टाहो अरेरे लोळती बेभान ! ॥ २ ॥
कोटि अश्रू सांडताती – जीवनाचे अर्घ्य देती !
हाक 'बाबा !' मारताती दीन वदने म्लान ! ॥ ३ ॥
पूज्य बाबा हाय गेले ! हे विधात्या काय केले ?
काल होते काय झाले आमुचे विद्वान ? ॥ ४ ॥
हाय गेला ज्ञानदीप ! कोसळे हा धम्मस्तूप !
काळझेप ! धिक्क मृत्यो ! तू किती नादान ! ॥ ५ ॥
वेळ घटिका काय आली ! मृत्युचा घाला अकाली
"भारताचा भीम वाली !" पावे अंतर्धान ! ॥ ६ ॥
वाहतो श्रद्धांजली ही ! शांति लाभो दिव्य देही
'पूज्य बाबा' घ्या प्रणाम ! शांति द्या भगवान ! ॥ ७ ॥

## माझ्या प्राणप्रिय समाजा,

समाजा, कधी तुला कळणार ?
बाबा गेले त्यांच्यामागे तूही का जळणार ? ॥ धृ० ॥
छोट्याचे तुज मोठे केले, कष्ट किती बाबांना झाले ?
आईच्या मायेने जपले
नाही का तो निर्वाणात्मा दुःखे तळमळणार ? ॥

तुला शिकविले बोलायाला, तुला शिकविले चालायाला
शस्त्र दिले जन रक्षायाला
तेच स्वतः तू स्वजनावरती उलटे पाजळणार ? ॥

मार्ग शुभंकर भगवंताचा धम्म दिला जो कल्याणाचा
मंगल व्हावे तुमचे, इच्छा
त्याही सुंदर तत्त्वापासुनि आता तू ढळणार ? ॥

चितेसमोरी घेउनि दिक्षा, 'सारे रक्षू धम्मा पक्षा ! '
ग्रहण करोनी मंगल शिक्षा
स्वार्थापायी भाई भाई मातीला मिळणार ? ॥

पावित्र्याचे सारे इमले, खचले आता गेले, झाले !
काय पहा हे आम्ही केले !
विघ्न भयंकर, गंडांतर हे नाही का टळणार ? ॥

मेळविले बाबांनी सारे, नालायक ही आम्ही पोरे
कलहापायी झालो ढोरे
काळेबेरे काढित एकमेकांवर जळणार ? ॥

चूक कुणाची कोण बरोबर, पाहू नंतर, पण हे लौकर
सोडवु कोडे जोडू अंतर
नाही याच्याविन गत्यंतर संकट हे छळणार ! ॥

सारे आम्ही भाऊ भाऊ, एका जागी केव्हा येऊ ?
एकोप्याने केव्हा राहू ?
क्षण भाग्याचा येइल का मग केव्हा हे जुळणार ? ॥

बिकट समस्या मार्ग परंतू, एकविचारे साधू हेतू
आकाशाला भिडवू सेतू
ऐक्याने अन् शुद्ध मनाने गत वैभव मिळणार ! ॥
वारकरी का हार फुलांचे ? घार करी संहार पिलांचे !
अमृत नसते हलाहलाचे !
मार लागता कोठे तेथे रक्तच साकळणार ! ॥
शत्रू संगत हाय नडे ही, आपसामध्ये दुही, लढाई
ही हातघाई नाशा नेई
सुरुंग लाविशि, नाही का हा किल्ला कोसळणार ? ॥
तुकडे तुकडे तटातटाचे ! लचके लचके गटागटाचे !
कारस्थानी क्रौर्य भटांचे !
बालेकिल्ला पडला तरिही आम्ही ना ढळणार ! ॥
सत्त्वपरिक्षा, सत्त्वपरिक्षा ! दीक्षा घेउनि पुन्हा उपेक्षा ?
ही तर शिक्षा काय अपेक्षा ? या त्या पक्षा मागा भिक्षा ! –
त्यापेक्षा व्हा म्हार !

## रात्र वैऱ्याची आहे, समाजा, जागा राहा !

डोळ्यांत तेल घालुनी समाजा, जागा पूर्ण राहा !
वैऱ्याची बघ रात रे कराया टपला काळ स्वाहा ! ॥ धृ० ॥
हे पतंग सत्याग्रही होमकुंडी
सर्वस्व पणा लावती देहदंडी
रणशूर पहा जाहले राजबंदी
सावधान नरवीर हो, रिपूच्या रक्तानेच नहा ! ॥ १ ॥
चौफेर नजर टाकुनी उचल पाऊल
झुकु नकोस भलतीकडे घेइ चाहूल
ऐकूच नको कसलिही कुणाची हूल
रणकुंड घोर पेटले, भडकले, सावध होइ पहा ! ॥ २ ॥
ठाकली उभी झुंजण्या त्रस्त जनता
मरणात हसे खदखदा, हर्ष कण्हता !
मानव्य दिव्य दर्शवी; धन्य नेता !
तख्तानशीन भीम हा करु रे विजयी बादशहा ! ॥ ३ ॥
फेडरेशन एकच जगी दलितवाली !
भिम कृपाछत्र सावली भाग्यशाली !
त्यापुढे कुणाची नसे माय व्याली
ही भीमशक्ति हिंदवी तपाची मोठी बुद्धगुहा ! ॥ ४ ॥
हो खडा–धडक द्यावया, खडक उखडू
कळि काळ चिरु चरचरा उभा जखडू
या सुरुंग लावुनि तटा, खिंड पाडू
होताच इशारा निळा फरारा चढवू उंच अहा ! ॥ ५ ॥
'जयभीम' नाद चहुकडे भिडव गगनी
जयघोष सकल पृथ्विच्या जडव कानी
चल चढव गौरिशंकरावरि निशाणी !
स्वामित्व गाजविल निळाच झेंडा फडको राजगृहा ! ॥ ६ ॥

# दत्तकविधान

[ माझ्यामागे या विराट, दलित, गरीब समाजाचे काय होणार ? ही खंत, प. पू. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अहर्निश जाळीत होती. त्यासाठी त्यांनी भगवान बुद्धाकडे धाव घेतली व हा पोरका समाज प्रत्यक्ष भगवंताच्या परम पवित्र ओटीत–निष्ठापूर्वक घातला. समर्पित केला. दत्तकविधान झाले आणि हा पददलित समाज 'नवबौद्ध' या सार्थ संज्ञेने सालंकृत झाला. ]

भगवन् करा आता सांभाळ !
घालुनि जातो ओटित अपुल्या समाज हा लडिवाळ ! ॥ धृ० ॥
जशी कोंबडी जपत पिलांना, जेऊ घाली आइ मुलांना
तळहाताचा करुनि पाळणा
जिवापाड मी जपले यांना केलि नसे आबाळ ! ॥ १ ॥
समाज माझा दिनदलितांचा, गरिब बिचारा नाही वाचा
जाच काढला ज्याचा त्याचा
पोटाशी मी धरुनी याचा करित आलो प्रतिपाळ ! ॥ २ ॥
प्राणापेक्षा प्रिय मला जे, अर्पण केले ते ते माझे
नाही आता मजवरि ओझे
मात्र पिलांना सांभाळा हो त्यास पहा विसराल ! ॥ ३ ॥
गोजिरवाणी माझी बाळे, नजर असू द्या वैरी काळे
टाकिल कोणी अवचित जाळे
फसतिल झाले केवळ पोरे त्यांस कशाचा ताळ ? ॥ ४ ॥

चिंता नाही मजला नाथा, असली कोणा मिळते माता ?
जीव सुखाने जाइल आता !
तूच जिथे त्राता भगवंता, काय करिल कळिकाळ ? ॥ ५ ॥
विश्वासाच्या स्थानी श्रद्धा !
'बुद्धं सरणं' माझा मुद्दा !
'धम्मं सरणं संघासुद्धा !'
माझ्यामागे यावरि सिद्धा, पाखर बुद्धा घाल ! ॥ ६ ॥
माझ्यानंतर आपण यांना !
ओटित घालित पंचप्राणा !
सांभाळा ही दौलत घ्याना !
भगवन् अपुल्या मांडीवरती दत्तक दिधले बाळ ! ॥ ७ ॥

## पुढारी ? पुंडअरी !

आला पुढारि भरली जत्रा
ह्याच्यावरुनि कोंबडं उतरा ! ॥ ध्रु० ॥
करा आरति दिवे ओवाळा
घाला गळ्यात नोटांच्या माळा
उदबत्त्या, सिगारेटि जाळा
ह्याला मढवा सोन्याचा पत्रा ! ॥ १ ॥
दृष्ट काढा या झाडून याची
धुरि याला द्या मीठमिरच्याची
बोटं कडकड, मोडा हं तुमची
'माझ्या गुणाच्या गाळीव पात्रा !' ॥ २ ॥
याला म्हणत्यात जागृत म्हसोबा
गर्दि उसळे दर्शना तोबा
घाला शेंदूर होउ द्या शोभा
मारा बालिगा, कोंबडं, बकरा ! ॥ ३ ॥
ह्याचा नैवेद्य बाटलि, बाई
त्याच्या[illegible]वाचून बेचैन होई
फंड, वर्गणि [illegible] काहीहि खाई
[illegible]च मित्रा ! ॥ ४ ॥
बहुजनाच्या कंठ[illegible]ता
ह्याच्या अंगात येईल [illegible]
मोठ्या रंगात झोकील बाता
बोंब ठोकील भाषण देता
[illegible]ता नाचाचा घेइल पवित्रा ! ॥ ५ ॥
[illegible] गरीब कैवारि हाच
[illegible]बा जालिम पिशाच्च
[illegible]बि जगात नकोच
[illegible] आईच्या बापाच्या पुत्रा ! ॥ ६ ॥
[illegible]ला जगात मोठाच मान
याला जगाचे अगाध ज्ञान

काढि धम्माचे शुद्ध दुकान !
रोज बाटल्या, वायका सत्रा ! ॥ ७ ॥
करी खैरात आश्वासनाची
बँक याच्याच बापजाद्याची !
भात बोलाचा कढी बोलाची
देइ लोकांच्या हाती धतूरा ! ॥ ८ ॥
फुगा फुगला सुजला बावा
केल्या कर्माचि जनतेचि सेवा
शाप आशिर्वादाचा पुरावा
लागु पडलि झोंबडमात्रा ! ॥ ९ ॥
ऐट राजाचि जात ठकाची
छाया साधूची माया वकाची
नाहि ओळख याला बुकाची
कुणि याला विचारीना कुत्रा ! ॥ १० ॥
ह्याच्या नावानं...आरोळ्या मारा !
ह्याच्या नावाचा पिटा डांगोरा !
फोडा अॅटम वाजवा बारा !
धिंड काढा या घालवा पितरा ! ॥ ११ ॥

## शाप-उःशाप !

रिपब्लिकन नेत्यांनो, करता पक्ष दुहीचे पाप !
तळपट होइल तुमचे ! माझा या भीमाचा शाप ! ॥ धृ० ॥
या जनतेची राखण केली
घरली पोटी मोठी झाली
आकाराला कन्या आली
दुष्टांनो, का नीती फिरली मेल्यावरती बाप ? ॥ १ ॥
प्राणपणाने जपली जनता
लळा लाविला माया ममता
रान जिवाचे केले असता–
माझ्यामागे तिजला छळता, का देता रे ताप ? ॥ २ ॥
बालेकिल्ला बळकट होता
संघटना ती वज्रांकीता
पोलादाची होती जनता
फितुरांनो तिजवरती उठता तुम्हीच ओढुनि चाप ? ॥ ३ ॥
पक्षाची ती सारी शिकवण —
धम्माचे ते सर्वोत्तम धन !
सगळे तुम्ही जाळुनि ढणढण –
मानासाठी माकड होउनि भकता वारेमाप ? ॥ ४ ॥
लोकांचा तो पैसा गिळता ?
दंडेलीने त्यांना पिळता ?
एकामेकांच्यावर जळता ?
तुम्ही लुटारु ! कोठे पळता ? पदरी घालिन माप ! ॥ ५ ॥
हाकलले मी यांना होते
ठाउक सर्वा झाले जे ते
अपराध्याला लाजच नसते
दूध पाजले यांना, तरि ते जातीचे हे साप ! ॥ ६ ॥
शेंदुर लावुन बसलो यांना !
देवपणा का ये दगडांना ?
पोतराज हे नंदी जाणा !
हकला यांना बैलोबांना देउ नका कुणि साथ ! ॥ ७ ॥

तीच चिता ती धडधडताना –
बुद्धं सरणं म्हटले हो ना ?
भीमं सरणं – शपथा – आणा –
होता निव्वळ काय बहाणा ? चोराची ती थाप ! ॥ ८ ॥
पुढारपण हे मिरवायाचे !
मी मोठा हे ठरवायाचे !
भल्याबुऱ्यांना ठकवायाचे !
गोरगरीबा चकवायाचे, नेते माकडछाप ! ॥ ९॥
सांगत होतो तुम्ही ढेकुळ!
जाल विरोनी, पाणी होइल !
गिळाल रे माशांनो तो गळ !
– विद्रोहाचा, कृतकर्माचा होइल पश्चात्ताप ! ॥ १० ॥
कल्पतरु मी लावुनि गेलो !
त्याच्यासाठी कितितरि खपलो !
पण आता मी दुःखी झालो !
कुऱ्हाडिचा हा दांडा गोता काळ, भयानक पाप ! ॥ ११ ॥
गरिब बिचारी माझी जनता !
नाही कोणी तिजला त्राता !
मृत्यूच्या ती लागे पंथा !
लाथाळ्यामधि खाई लाथा, मुकीच ती अश्राप ! ॥ १२ ॥
भोळी जनता रडते धडधड !
बघवत नाही असली परवड !
बोटे मोडी कड कड कड कड !
तिळपापड हो लाही लाही अंगाचा थरकाप ! ॥ १३ ॥
तळतळाट तो या जनतेचा !
कोप तसा त्या भगवंताचा !
शाप तुम्हांला लागो माझा !
अधःपात रे होइल तुमचा नाशहि आपोआप ! ॥ १४ ॥
'पुन्हा एक व्हा,' वजावतो मी–
'या घरट्यात– अपुल्या धामी !'
'सांगा सारे एकच आम्ही !'
येइल कामी तर परिणामी माझा हा उःशाप ! ॥ १५ ॥

## गंगार्पण !

झालं गेलं, विसरा सारं, गंगेला वाहिलं !
फाटाफुटिनं, कोणाचंही, झालं नाहि भलं !
अक्षरशः चुकलं ! ।।

रक्ताचं हे, नातं रक्त – रक्ताकडं वळलं
पुण्याईच्या पंखाखाली, भीमाईचि पिलं
घारगिधाड टपलं ! ।।

वैरी काळा, त्याचा डोळा, नाही पाहवलं !
त्याला फावलं, विष कालवलं, खुप भांडण लावलं
बोटानं घर दावलं ! ।।

जळत मनात होतं त्याच्या, कपट तसं पहिलं
वैर जुनं ते साधवलं अन् कोलित शिलगावलं
महाभारत घडलं ! ।।

एकीचं बळ असतं पुष्कळ, आज खरं कळलं
सव्वीस वर्षे वाया गेली, फुकटच दळदळलं
त्यातुनि काय मिळलं ? ।।

सत्तेचं घर अपुलं; परकं, सासर अनुभवलं !
नको हवेल्या, माड्या, अपुलं झोपडं लाख भलं !
आपलं ते आपलं ! ।।

भाजीभाकर मोलाची ती, सत्तेचं टोपलं !
परक्याचा तो दाणागोटा. हगवण लागे कळ
उठपळ भळभळलं ! ।।

बस्स घरावर घातलि पुष्कळ, सोन्याची कौलं
गाद्या जळु द्या, बरि वडिलांची वाकळ हेच खरं
पटलं हो सगळं ! ।।

चांगलं दिसलं, मन हे वसलं, परक्याचं घर घुसलं
दिसतं तसं ते नसतं, ठसलं ! गुपचुप बोलावलं
सांगु कां काय ठरलं ? ।।

( पन्–सांगाय नको म्होरलं )

आइ विसरलो, बंधू–भगिनी, काढुनि गेलो पळ
सटवाईच्या नादी लागुनि झालं वाटोळं
सपशेल घर बुडलं ! ॥

आईची सर दाईला का ? सवतीची ही मुलं
सुसरीबाई पिल्लं खाई, डोळं का भरलं ?
वेड का पांघरलं ? ॥

' जळतं घर ते ' कसलं असतं, डोळ्यांनी पाहिलं
त्यात जे राहिलं–त्याचं भरलं–तिकिट मिळे वरलं
लाक्षागृह ठरलं ! ॥

गुळाला मुंगळं, लोण्याचं गोळं, खुर्चिस खिळलं खिळं !
' खडक अभंग असतो, विरतं, पाण्यात ढेकूळ ! '
बाबांनिच म्हटल ! ॥

गाडित गुगलं, राहायाला बंगलं, खायाला लई चांगलं !
पायाला बांधलं, उलटं टांगलं, वटवाघुळ लोंबलं
तोंडात काय कोंबलं ? ॥

राखिव जंगलं, त्यातच रंगलं, करत्यात काय डोंबलं ?
गाईने ना वासरु हुंगलं, हेलपाट्यात मेलं !
आंबलं न् खुप बोंबलं ! ॥

काखंत झोळी, भिक्षेची थाळी, नेहमिच दानपावलं !
गरिबा मरु द्या, अन्नान्न करु द्या, अरगट कालवलं
हे काय चालवलं ? ॥
(गरिबा घालवलं ! )

हिमालयाची दाखवि उंची नवलाचं कवलं !
चार दोन पावलं, सरडं हे धावलं, तेवढ्यानं शेफारलं
बुटबैंगण ठरलं ! ॥

स्वप्न मनोहर अतिशय सुंदर नियतीला पडलं !
हीरेजडित, रत्नमंडित–ऐक्य अमोल घडलं !
सोनं सापडलं ! ॥

जनता जनार्दन साक्षात् भगवन् दर्शन हे घडलं !
आज उघडलं डोळं, दिसलं, घर संसार, मुलं
आलो माणसांत वरं ! ॥
रीपब्लीकन ऐक्यच आता, भांडण हे सरलं !
सर्व समाजासाठी आम्ही कोंडं पालटलं !
बाबांचं पटलं ! ॥
जातीसाठी माती खाती त्याचं होतं भलं !
दीनादलिता पोटी धरती त्यावर पडति फुलं !
कंठी हार पडलं ! ॥
आज वळाली भगवंताची सोन्याची पावलं !
'जयभिम—जयभिम !' गर्जा सारे, कुलदैवत अपुलं !
वंदू पदकमलं ! ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
काव्य 2535 / 24890 / 9/2/06
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)
REFBK-0024810
REFBK-0024810

## अघटीत – अतर्क्य !

आभाळाचा कागदही
समुद्राची सारी शाई
तरि अपुरेच राही – भीमायन ॥ १ ॥
धरतिचा तळ उणा
नद्यानाले, पर्वतांना
तोलले तरी भरेना – भीमराणा ॥ २ ॥
वने, उपवने, पाणी
पशू, पक्षी, सृष्टी, प्राणी
पडतात सारी उणी – भीमायनी ॥ ३ ॥
चंद्र, सूर्य, नक्षत्रे ही
तारे, वारे, सारे काही
ब्रह्मांडही रिते होई – भीमापायी ॥ ४ ॥
तोलामोला नाही अंत
शब्द, वाणी व्यतिरिक्त
भीमचरित्र अगाध – वर्णनातीत ॥ ५ ॥



श्री. बा. पं. काकडे ऊर्फ कवि किशोर: फलटण येथे जन्म ८ ऑगस्ट १९१७. त्यांचे आजोळ वीर (वाल्हे) जि. पुणे येथे मराठी ४ थी पर्यंत शिक्षण. मुधोजी हायस्कूल फलटण येथे मॅट्रिकपर्यंत शिक्षण. १९३२ मध्ये अल्पवयात येथील राणीसाहेब व राजेसाहेब यांनी कवि किशोर पदवी दिली. १९३९ मध्ये फलटण येथे परिषद झाली. तेथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कवि किशोर या नावाला शिक्कामोर्तब केले. वयाच्या १४, १५ वर्षापासून लेखन 'हिंदू धर्माचा कलंक' 'सुधारक चोर' दोन नाटके लिहिली व फलटण, पुणे, मुंबई येथे रंगभूमीवर आणली. आणि त्यामध्ये स्त्री भूमिका केली. काव्यलेखन, सामाजिक कार्यात रस व डॉ. बाबासाहेबांच्या चळवळीत स्वतःस वाहून घेतले. तळमळीचे कार्यकर्तेही आहेत.

फलटण दलित फेडरेशनचे पहिले तालुका अध्यक्ष (१९४२) 'सुबोध जलसा' या माध्यमाद्वारे लोकजागृती. १९४८ मध्ये संयुक्त संस्थानी गटाचा प्रतिनिधी म्हणून सांगली येथे निवड. १५-८-५० मध्ये मुंबईतील दलित कवि मंडळाचे अध्यक्षपद. क्रांती वैभव कलापथकाची स्थापना. १९४९ नंतर ६ वर्षे फेडरेशनचा प्रभावी प्रचार केला. बाबासाहेबांनी त्यांची प्रशंसा केली. कलापथके, समाजाची सेवा, काव्य, नाटके इ. समाजाला आयुष्य वाहिले.

कवि किशोर या समाजातील पहिलेच क्रांतिकारक व आद्यप्रवर्तक कवी होत. पहिले नाटककार व हा कवि विद्रोही ललित वाङमयाचे खास लेणे चढवून व हिऱ्या मोत्यांनी वाङमय शारदेस मढवून टाकणारी त्यांची सर्वगामी ओघवती लेखणी खास देखणी असून आपल्या पहिल्या वारशाचा स्वच्छ आरसा रसिकांपुढे मांडीत आहोत.

व्ही. के. इंजे
बी. डी. डी. चाळ नं. ५७ । १४
वरळी, मुंबई १८.